# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुलांची वाचन क्षमता वाढविण्याबाबत**

**(१) ५९५८८ (२२-०९-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रथम संस्थेमार्फत ३३ जिल्ह्यातील ९८४ गावांमध्ये मुलांची शैक्षणिक स्थिती सन २०१५-१६ मध्ये तपासण्यात येऊन ३६ हजार ८३३ मुलांपैकी इयत्ता पहिली स्तराची वाचन क्षमते अंती ६३.३ टक्के विद्यार्थ्यांची वाचन क्षमता चांगली असल्याची बाब माहे जून, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाचन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणते उपाय योजले आहेत व उपायाअंती किती टक्के विद्यार्थ्यांची वाचनक्षमता वाढली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) मुलांची वाचन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र विद्या प्राधिकरण मराठी विभागामार्फत इ. १ ली ते ५ वी तील सर्व विद्यार्थ्यांकरिता मुलभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रम घेण्यात आला.

त्यानुसार मार्च २०१८ अखेर अध्ययन स्तरनिश्चिती कार्यक्रमातून प्राप्त माहितीनुसार राज्यातील इयत्ता १ ली ते ५ वी तील विद्यार्थ्यांची वाचन क्षमता सरासरी ७३.१८% इतकी दिसून येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण व डोंगरी भागातील गांव व वाड्यावस्त्याकरिता नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करण्याबाबत**

**(२) ७४९६८ (२०-०४-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण व डोंगरी भागातील गावांकरीता तसेच वाड्यावस्त्यांकरीता अनेक वर्षापुर्वी नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करणेत आल्या आहेत त्यातील अनेक योजना कालबाह्य तसेच नादुरुस्त असल्याने त्यामुळे डोंगरी भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण व डोंगरी भागातील लहान लहान गावांना व वाड्यावस्त्यांकरीता कार्यान्वीत असणा-या परंतु नादुरुस्त व कालबाह्य झालेल्या नळ पाणी पुरवठा योजनांची कामे मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेच्या निकषामध्ये बसत नसल्यामुळे उक्त योजनांच्या कामांना निधी उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेच्या निकषामध्ये न बसणा-या ग्रामीण व डोंगरी भागातील लहान लहान गावांना व वाड्यावस्त्यांना पिण्याच्या पाण्याच्या योजनांची कामे करणेकरीता प्रत्येक ग्रामीण मतदारसंघाला १० कोटी रुपयांच्या निधीची अर्थसंकल्पातून वेगळी तरतूद करावी अशी ग्रामीण व डोंगरी भागातील लोकप्रतिनिधींची मागणी असून अशा आशयाचे एक पत्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व मा.वित्तमंत्री यांना दिनांक २१ जानेवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व पत्राच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०७-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील ग्रामीण भागामध्ये पूर्ण झालेल्या योजनांपैकी कार्यान्वित व बंद असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| वर्गवारी | स्वतंत्र | प्रादेशिक | एकूण |
|---|---|---|---|
| (१) पूर्ण झालेल्या योजना | ४०१२० | ६४३ | ४०७६३ |
| (२) कार्यान्वित योजना | ३८८५८ | ४५६ | ३९३१४ |
| (३) बंद पडलेल्या योजना | १२६२ | १८७ | १४४९ |
| (३)(i) कायमस्वरुपी वा आयुर्मान संपल्यामुळे बंद पडलेल्या योजना | ९८१ | ९४ | १०७५ |
| (३)(ii) पुनरुज्जीवन करणे शक्य असलेल्या योजना | २८१ | ९३ | ३७४ |

उपरोक्त योजना बंद असण्याची कारणे खालीलप्रमाणे:-

i) योजनेचा स्त्रोत कोरडा / अपुरा असणे
ii) योजनांचे आयुर्मान संपणे
iii) पाणीपट्टीची योग्य आकारणी आणि त्यानुसार पुरेशी / पुर्णत: वसुली न होणे.
iv) वीज देयक थकीत असणे.
v) योग्य देखभाल- दुरुस्ती न होणे.
vi) पाण्याची गुणवत्ता योग्य नसणे.

vii) योजनेत समाविष्ट गावांना पर्यायी स्त्रोतातून पाणी पुरवठा उपलब्ध होत असल्याने योजना बंद पडणे

viii) योजना हस्तांतरीत न झाल्याने देखभाल-दुरुस्ती न होणे.

(२) हे खरे नाही.

ज्या योजना किंवा त्यांची उपांगे कालबाह्य झालेली आहेत यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या वार्षिक कृती आराखड्यामध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यात येते.

अ) केंद्र व राज्य निधी समप्रमाणात :- राज्यातील फ्लोराईड बाधीत, संसद आदर्श ग्राम योजनेंतर्गत व हागणदारीमुक्त गावे / वाड्यांतर्गत योजना.

ब) राज्य निधी (जिल्हा वार्षिक योजना):- इतर वर्गवारीतील गावे / वाड्यांतर्गत नवीन योजनांसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधीची तरतूद करण्यात आली आहे.

तसेच देखभाल व दुरुस्तीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

i) नळ पाणी पुरवठा योजनांची योग्य देखभाल दुरुस्ती होण्याच्या दृष्टीने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाणीपट्टीची योग्य आकारणी करुन त्याची वसूली करुन त्यातूनच देखभाल दुरुस्तीचा खर्च भागविणे अपेक्षित आहे.

ii) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत कृती आराखडा तयार करुन केंद्र हिश्याचा १५% निधी व समप्रमाणात राज्य/ जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

iii) जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या २०% रक्कम जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीत जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सदर निधीतून पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती करणे अपेक्षित आहे.

iv) १४ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून सदर योजनांची देखभाल दुरुस्ती करणे अपेक्षित आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता ग्रामीण व डोंगरी भागातील योजनांसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध होणे शक्य आहे.

(३) होय, हे खरे आहे.

मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनीकडून सदर आशयाचे पत्र मा.मुख्यमंत्री महोदयांना देण्यात आले होते.

(४) अस्तित्वात असलेल्या योजनेमध्ये ज्या लहान गावांचा व वाड्यावस्त्यांचा समावेश नाही अशी गावे व व वाड्यावस्त्यांचा समावेश करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बोणवली व पोमेंडी (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) या दोन गावांना पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(३) ९२०२१ (२१-०८-२०१७). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत बोणवली व पोमेंडी या दोन गावांना २५ वर्षापासून पाणी पुरवठा करणारी योजना लोकवस्ती वाढीमुळे अपूर्ण तसेच पडत असून जीर्ण झाल्याने वारंवार बंद पडत असल्याने पिण्याच्या पाण्याच्या भीषण टंचाईला वारंवार तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजना नवीन करणे तसेच ३ ते ५ कि.मी. अंतरावर असलेल्या पिंपर या गावातील धरणातून पाणी पुरवठा करावा अशी मागणी शासनाकडे वारंवार करुनही यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असलयास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात आढळून आले व त्यानुसार उक्त दोन गांवांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) पोमेंडी व गोणवली या दोन गावांसाठी नळ पाणी पुरवठा योजनेच्या सार्वजनिक विहिरीतून पाणी पुरवठा करण्यात येतो. माहे मार्च पासून विहिरीचे पाणी कमी कमी होत जाते व पाच दिवसाआड पाणी पुरवठा केला जातो. माहे मे मध्ये विहीर कोरडी पडते, त्यावेळी खाजगी मालकीच्या विहिरीतून व बोअरवेलमधून ग्रामस्थ पाणी भरतात.

पोमेंडी मधलीवाडी, बौद्धवाडी, मराठवाडी, तेलीवाडी व न्हावीवाडी या वाड्यांसाठी एक व पोमेंडी पूर्व रांगळेवाडी येथे नळ पाणी पुरवठा योजना करणे अशी दोन कामे राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम सन २०१६-१७ अंतर्गत समाविष्ठ होती. गोणवली या गावाच्या नळ पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. तथापि, केंद्र शासनाच्या दिनांक २९.०६.२०१५ च्या पत्रान्वये, "ज्या योजनांना दिनांक २९.०६.२०१५ पूर्वी कार्यादेश दिलेले आहेत, तसेच ज्या योजना प्रत्यक्षात प्रगतीपथावर आहेत अशाच योजनांवर निधी खर्च करण्यात यावा. ज्या योजनांना राज्यस्तरीय योजना समितीने मान्यता दिलेली आहे, परंतु सदर योजना नियोजन टप्पा / निविदा प्रक्रियेत आहेत अशा योजनांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये," अशा सूचना असल्यामुळे सदर योजनांचे काम हाती घेण्यात आले नाही. आता या योजना सन २०१८-१९ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या वार्षिक आराखड्यात समाविष्ट आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांनी विद्यापीठाला विविध शुल्कापोटी देय असलेल्या शुल्काबाबत

**(४) ९६३६४ (२९-१२-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ७७४ महाविद्यालयांनी विद्यापीठाला देय असलेले २५ कोटी रुपये थकवले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू महाविद्यालयाकडून ही रक्कम देण्यास टाळाटाळ होत असल्याने मुंबई विद्यापीठाकडे आर्थिक प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, शुल्क वेळेत मिळत नसतानाही विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्नता दिली जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार उपरोक्त महाविद्यालयाकडे असलेली थकीत रक्कम वसूल करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच माहे नोव्हेंबर, २०१७ अखरे एकूण किती रक्कम वसूल केली आहे व किती रक्कम वसूल होणे बाकी आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे. मुंबई विद्यापीठाच्या एकूण ७७४ महाविद्यालयांपैकी १६८ संलग्नित महाविद्यालयांच्या शुल्क लेखांची अंतरिम तपासणी केली असता सदर महाविद्यालयांकडून रुपये ३५,४१,७०,६४०/- (रुपये पस्तीस कोटी एकेचाळीस लाख सत्तर हजार सहाशे चाळीस फक्त) संलग्नता शुल्क येणे बाकी असल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले आहे. उर्वरित महाविद्यालयांच्या थकीत शुल्काविषयीचे कामकाज प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही. महाविद्यालयांनी संलग्नता शुल्क दिल्याशिवाय विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्नता दिली जात नही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात संशोधन केंद्र व पर्यावरण प्रयोग शाळा स्थापन करण्याबाबत**

**(५) ९६४३६ (२९-१२-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पर्यावरण संरक्षण अधिनियम-१९८६ च्या कलम १२(१) (अ) अन्वये पर्यावरण प्रयोगशाळा स्थापन करण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे, हे खरे आहे काय, ?
(२) असल्यास, संशोधन केंद्र व पर्यावरण प्रयोग शाळा स्थापन करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ च्या कलम १२ (१) अन्वये केंद्र पर्यावरण प्रयोगशाळा स्थापन करु शकते तसेच विविध प्रयोगशाळांना पर्यावरण प्रयोगशाळांचा दर्जा देऊ शकते. त्यानूसार केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेन्वये राज्यातील विहित निकष पूर्ण करणाऱ्या विविध प्रयोगशाळांना पर्यावरण प्रयोगशाळांचा दर्जा केंद्र शासनाने दिला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एम फील व पी. एच.डी.धारकांच्या प्राध्यापक पदी केलेल्या अवैध नियुक्त्यांबाबत**

**(६) १००४९२ (२९-१२-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एम फील व पी.एच.डी. धारकांच्या प्राध्यापक पदी केलेल्या अवैध नियुक्त्यांबाबत मा.राज्यपाल महोदय यांनी दिनांक १७ मे, २०१० रोजी वा त्यासुमारास सर्व विद्यापीठांना कारवाईचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थीती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०६-२०१८) :** (१) व (२) नमूद विषयाबाबत मा. कुलपती महोदयांना दि. १३.०८.२००९ रोजी प्राप्त झालेले निवेदन शासनाच्या दि. १७ मे, २०१० च्या पत्रान्वये विद्यापीठांना अग्रेषित करून अधिव्याख्याता पदाच्या अर्हतेबाबत विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शासन व मा. न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेशानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून नियुक्ती करण्याबाबत तसेच बेकायदेशीर नियुक्त्या झाल्या असल्यास त्या तात्काळ रद्द करण्याबाबत कळविण्यात आले. हे खरे आहे.
शासनाच्या उक्त पत्रान्वये दिलेल्या सूचनांनूसार काही अकृषि विद्यापीठांमध्ये झालेल्या अवैध नियुक्त्या रद्द केलेल्या आहेत. काही विद्यापीठांमध्ये अशा प्रकारच्या अवैध नियुक्त्या केलेल्या नव्हत्या. सद्यस्थिती विद्यापीठांमध्ये एम.फील व पीए.डी. धारकांच्या अवैध नियुक्त्या अस्तित्वात असल्याचे आढळून येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी कमवा आणि शिका या योजनेचा लाभ देण्यात आला नसल्याबाबत**

**(७) १००९१८ (२९-१२-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर, या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी कमवा आणि शिका या योजनेतंर्गत १९५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले असतानाही काही विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला नसल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठात भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा व नागपूर या जिल्ह्यातील बहुतांश विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेत असून त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानूसार उक्त योजेचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांना मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कमवा आणि शिका योजनेंतर्गत १९५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. पहिल्या टप्प्यात ऑक्टोबर, २०१७ पर्यंत १९५ पैकी १०२ विद्यार्थ्यांना तर दुसऱ्या टप्प्यात २ डिसेंबर, २०१७ पर्यंत उर्वरित सर्व विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तलासरी पाणीपुरवठा विभागांतर्गत ५ कोटी रुपयांची नळ पाणीपुरवठा योजना अयशस्वी झाल्याबाबत

**(८) १०१७०७ (२९-१२-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) पाणीपुरवठा विभागाअंतर्गत ५ कोटी रुपयांची नळ पाणीपुरवठा योजना अयशस्वी झाल्याचे दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पाणीपुरवठा विभागाने नगरपंचायतीस वर्ग केली असता नगरपंचायतीमधील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळ प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दिरंगाई करणाऱ्या संबधितांवर कोणती कारवाई केली तसेच उक्त योजना सुरळीत सुरु होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ मध्ये तलासरी नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती. योजनेच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन

माहे मार्च, २०१५ मध्ये सदर योजनेचे काम सुरु करण्यात आले. दरम्यान, ग्रामपंचायत बरखास्त होऊन दिनांक ०७ मे, २०१६ रोजी नवीन नगरपंचायत अस्तित्वात आली. योजनेच्या कामाचा कालावधी २४ महिने होता व सदर मुदतीत योजनेचे काम पूर्ण करण्यात आले. सद्य:स्थितीत सदर योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. तलासरी नगरपंचायतीने हस्तांतरणानंतर योजना कार्यान्वित करणेकामी नागरीकांच्या सोईकरीता नळ पाणी पुरवठा योजनेचे कनेक्शन देण्यासाठी अर्ज मागविण्यास सुरुवात केली आहे. प्राप्त अर्जानुसार नळ पाणी पुरवठा कनेक्शन देण्याची तजवीज ठेवली आहे.

सदर योजनेच्या वितरण व्यवस्थेवर तात्पुरत्या स्टँड पोस्ट देवून योजना चाचणी सुरु ठेवण्यात आली. योजनेचा चाचणी कालावधी १ वर्ष होता. चाचणी कालावधी ३१ मार्च, २०१८ रोजी पूर्ण झाल्यानंतर उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, डहाणू यांनी दिनांक ०५ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर योजना तलासरी नगरपंचायतीस एकतर्फी हस्तांतरीत करण्यात येत आहे, असे तलासरी नगरपंचायतीस कळविले होते. तथापि, नगरपंचायतीकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने सद्य:स्थितीत सदर योजना ठेकेदारामार्फत चालविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेचे प्रस्ताव प्रलंबित असलेबाबत**

**(९) १०१९१४ (२९-१२-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इयत्ता १ ली ते १२ वी शिकणाऱ्या मुला/मुलींना अपघातामुळे झालेल्या क्षतीची नुकसान भरपाई देणेसाठी शासनाने राजीव गांधी विद्यार्थी सानुग्रह अनुदान योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय ,

(२)असल्यास, या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना सानुग्रह अनुदान मिळणेसाठी पंचायत समिती सिन्नर (जि.नाशिक) यांचेमार्फत सन २०१२ मध्ये सादर करण्यात आलेले ९ प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करून विद्यार्थ्यांना सानुग्रह अनुदान उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०६-२०१८) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय.
(४) राजीव गांधी विद्यार्थी सानुग्रह अनुदान योजनेतर्गत दाव्यांची पूर्तता करण्यासाठी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दि.१७/०५/२०१८ अन्वये रु.७,६९,६५,०००/- इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुळगाव बदलापूर व अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपलिकेच्या हद्दीमध्ये नवीन पाणी कनेक्शन बंद असल्याबाबत

**(१०) १०६२९१ (१९-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव बदलापूर व अंबरनाथ(जि.ठाणे) नगरपलिकेच्या हद्दीमध्ये पिण्याचे पाणी भरपूर प्रमाणात असूनही त्याठिकाणी नवीन पाणी जोडणी बंद असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर व अंबरनाथ नगरपलिका हद्दीतील नवीन गृहसंकुलाना व पुरेसे पाणी उपलब्ध न होणाऱ्या गृहसंकुलाना टँकरने पाणी न पुरविणेबाबतचे आदेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नवीन पाणी जोडणी देणेबाबत व टँकरने पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच मुबलक प्रमाणात पाणी साठा उपलब्ध असूनही नवीन पाणी जोडणी बंदचे आदेश देणाऱ्या सबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. दि.५ जानेवारी, २०१८ रोजी अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्रांतर्गत अंबरनाथ पश्चिम येथील बुस्टर केंद्रातून अवाजवी टँकर भरुन देण्यात येत असल्याची दूरध्वनीद्वारे प्राप्त तक्रार व सोशल मिडीयावरील क्लीप, याची खातरजमा केल्यानंतर प्रशासकीय व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याच्या दृष्टीने पुढील आदेश मिळेपर्यंत कोणालाही टँकर भरुन देण्यात येऊ नयेत, असे आदेश क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर देण्यात आलेले होते.
(३) व (४) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांच्या टँकरने पाणी पुरवठा करण्यास दिलेल्या मंजूरीच्या आदेशाचा गैरवापर करुन, क्षेत्रीय स्तरावर लेखी स्वरुपात टँकरची मागणी न घेता, तसेच, शहरात अपरिहार्य कारणास्तव पाणी पुरवठा होऊ शकला नाही, याची खातरजमा न करताच, टँकर भरुन दिले जाणे, पाण्याची देयके ही पाणी मागणी केलेल्या

ग्राहकांच्या नावांऐवजी टँकर सप्लायर्सच्या नावे दिसून येणे, ऑगस्ट, २०१७ पासूनची, १५ पावत्यांद्वारे एकूण ७७३ टँकर्सची देयके एकाच दिवशी जमा करणे, इ.बाबी दि.५ जानेवारी, २०१८ रोजी प्राप्त तक्रारीनुसार केलेल्या तपासणीअंती निदर्शनास आल्या.

मा.उच्च न्यायालयाचे आदेश व त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने घालून दिलेल्या अटींचे उल्लंघन करुन टँकरद्वारे पाणी पुरवठा होत असल्याने, संबंधित कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता यांचेवर महाराष्ट्र नागरी व सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अंतर्गत प्रशासकीय कारवाई सुरु करण्यात आलेली आहे. तसेच दि.१३.१.१८ पासून अंबरनाथ बुस्टर व दि.३०.१.२०१८ पासून खरवई बदलापूर येथील टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दि.२४.११.२०१६ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार, किरकोळ ग्राहकांना घरगुती/वैयक्तिक नळ जोडणी देण्यात येत आहे. तसेच, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२३.८.२०१६ च्या संचालक मंडळाच्या बैठकीतील सहकारी गृहनिर्माण प्रकल्प व निवासी वसाहतींना पाणी पुरवठा करण्यासाठी भांडवली अंशदान लागू करण्याबाबतच्या निर्णयानुसार सोसायट्यांना अंशदानाचे दर जास्त वाटल्यामुळे सोसायट्यांनी अंशदान भरण्यास तयारी दर्शविली नाही. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२७.३.२०१८ च्या संचालक मंडळाच्या बैठकीत सहकारी गृह निर्माण प्रकल्प व निवासी वसाहतींना पाणी पुरवठा करण्यासाठी भांडवली अंशदानाचे दर नव्याने निश्चित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती शिवाजी महाराजाचे अधिकृत चरित्र प्रकाशन करण्यासाठी इतिहास संशोधक व लेखक यांची समिती नियुक्त करण्याबाबत

**(११) १०६३७७ (०५-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराजांचे अधिकृत चरित्र प्रकाशन करण्यासाठी इतिहास संशोधक व लेखक यांची समिती नियुक्त करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी इचलकरंजी यांनी मा. मंत्री सांस्कृतिक कार्य यांच्याकडे दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, महाराष्ट्र शासनाने छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र प्रकाशनासाठी समिती नियुक्त केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत गठित केलेल्या समित्यांमार्फत थोर राष्ट्रीय पुरुषांचे साहित्य प्रकाशित करण्यात येते. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांचे साहित्य प्रकाशित करावयाचे नसून, त्यांचा इतिहास प्रसिद्ध करावयाचा आहे. त्यामुळे नामांकित/अधिकृत इतिहास संशोधकाची व लेखकाची आवश्यकता लागणार आहे. अधिकृत इतिहासाचे संशोधन करणे ही बाब उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येत नसल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवचरित्र लिहून, प्रकाशित करण्यासाठी समिती स्थापन करावी किंवा कशी याबाबतचा निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अप्रशिक्षीत शिक्षकांची माहिती उपलब्ध करण्याबाबत**

**(१२) १०६४४२ (०६-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने सेवा हक्क कायदयाची अंमलबजावणी सुरु केली असून महाराष्ट्र विदया प्राधिकरणाच्या संचालकाने राज्यातील अप्रशिक्षीत शिक्षकांची माहिती माहे सप्टेंबर, २०१७ पर्यंत शासनाला उपलब्ध करुन देण्याचे आदेश निर्गमित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारंवार मुदतवाढ देऊन तसेच अनेक वेळा पाठपुरावा करुनही माहिती मिळत नसल्याने महाराष्ट्र विद्या प्रधिकरणाच्या संचालकांनी राज्यातील सर्व शिक्षणाधिका-यांना कारणे दाखवा नोटीस माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तसेच ज्या शिक्षधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यांच्या विरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमाच्या जिल्हानिहाय अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांनी दि.१८.९.२०१७ पूर्वी सेवातंर्गत प्रशिक्षणासाठी योग्य त्या प्राधिकरणाकडे अर्ज करणे व दि.३१ मार्च, २०१९ पर्यंत डी.एल.एड. पदविका प्राप्त न झाल्यास अशा अप्रशिक्षित शिक्षकांच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील याबाबतच्या सूचना राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या शाळांच्या मुख्याध्यापकांना बजावण्याबाबत महाराष्ट्र विद्या

प्राधिकरण पुणे यांचेकडून शिक्षणाधिकारी प्राथमिक /माध्यमिक व क्षेत्रीय अधिकारी यांना कळविण्यात आले होते. संबंधित प्राधिकाऱ्यांना दि.२८/९/२०१७, १८/१०/२०१७ व ८/११/२०१७ अन्वये स्मरण करुन देखील त्यांचेकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे दि.१६.१२.२०१७ च्या पत्रान्वये त्यांना नोटीस देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील सिंदखेडराजा व देऊळगाव राजा या दोन तालुक्यातील हातपंपांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१३) १०६५०५ (०५-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील सिंदखेडराजा व देऊळगाव राजा या दोन तालुक्यात १५० गावे असून ७०० हातपंपांची दुरुस्ती करण्याकरिता एकच वाहन व तीन कर्मचारी असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या हातपंपाच्या दुरस्तीकरिता आवश्यक कर्मचारी वर्ग व वाहनांची सोय करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) माहे डिसेंबर २०१७ ते माहे मार्च २०१८ अखेर देऊळगाव राजा तालुक्यातील एकही हातपंपाची तक्रार दोन्ही पंचायत समिती अंतर्गत प्रलंबित नव्हती.

देऊळगाव राजा तालुक्यासाठी स्वतंत्र हातपंप दुरुस्ती पथक नसले तरी सदर तालुक्यातील खडकपूर्णा नदीच्या अलिकडील २० गावांमधील ९६ हातपंपांची दुरुस्ती गट विकास अधिकारी पंचायत समिती, चिखली यांचेकडील हातपंप दुरुस्ती पथकामार्फत तसेच खडकपूर्णा नदीच्या पलिकडील ३४ गावांमधील १५९ हातपंपांची दुरुस्ती गट विकास अधिकारी पंचायत समिती, सिंदखेडराजा यांचेकडील हातपंप दुरुस्ती पथकामार्फत करण्यात येते.

सिंदखेडराजा तालुक्यासाठी हातपंपांच्या दुरुस्तीकरिता आवश्यक कर्मचारी वर्ग व वाहनाची सोय करण्यात आलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील उच्चशिक्षण घेणा-या विदयार्थ्यांची संख्या वाढत असतांना**
**प्राध्यापकांच्या प्रमाणात घट होत असल्याबाबत**

**(१४) १०७००४ (०५-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत २ वर्षात महाविद्यालयात उच्चशिक्षण घेणा-या विदयार्थ्यांची संख्या वाढत असतांना प्राध्यापकांच्या प्रमाणात मात्र घट होत असून विदयापीठा मध्ये तीस -पन्नास- विदयार्थ्यामागे एक प्राध्यापक असे प्रमाण असल्याचे राष्ट्रीय उच्च शिक्षण अहवालानुसार माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयातील प्राध्यापकांचे प्रमाण कमी-कमी होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार राज्यात नवीन प्राध्यापकांची नियुक्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वित्त विभागाच्या दि.२५.०५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार सुधारित आकृतीबंध मंजूर होईपर्यंत पदभरतीस बंदी आहे.

(३) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकीय पदांचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड शहरासाठी (जि.कोल्हापूर) घटप्रभा नदीवरुन कार्यान्वित**
**केलेली योजना निष्फळ ठरल्याबाबत**

**(१५) १०७१६१ (१४-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड शहरातून घटप्रभा नदीवरुन राबविण्यात आलेली नळपाणी पुरवठा योजना फिल्टर अभावी निष्फळ ठरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार चंदगड शहरासाठी राबविण्यात आलेल्या योजनेचे पाणी

फिल्टर करुन सदर गावाला पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाली असून, यामध्ये जलशुध्दीकरण केंद्राच्या कामाचा समावेश नाही. सदर योजनेचा स्त्रोत हा घटप्रभा नदीवरील साठवण तलाव आहे. यात पाझर विहीर बांधली आहे. विहीरीतील पाझरलेले पाणी साठवण टाकीत घेतले जाते. साठवण टाकीतील पाणीसाठयाच्या प्रमाणानुसार टी.सी.एल. पावडर द्रावण मिसळून पाणी निर्जंतूकीकरण करुन ग्रामपंचायतीमार्फत पाणी वितरीत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रवरासंगम व तीन गावाच्या (जि.अहमदनगर) राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजनेअंतर्गत गैरप्रकार झाला असल्याबाबत**

**(१६) १०७९३१ (१४-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रवरासंगम व तीन गावाच्या (जि.अहमदनगर) राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेअंतर्गत गैरप्रकार झाला असल्याने त्याची चौकशी करण्याच्या मागणीकरिता दिनांक २ ऑक्टोबर २०१७ रोजी वा त्यासुमारास अरुण श्रीपती चव्हाण यांनी आमरण उपोषणाचा इशारा केला होता हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०७-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
सदर प्रकरणी उप अभियंता, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे, उप विभाग, नेवासा यांचेकडून चौकशी करुन घेण्यात आली आहे. चौकशी अहवालानुसार योजनेतंर्गत भ्रष्टाचार झाल्याचे दिसून आले नाही. गावातील काही ठिकाणी वितरण व्यवस्थेत गळती आढळून आली, सदर गळती ग्रामपंचायतीमार्फत बंद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**वसंतराव नाईक महाविद्‌यालयात (जि.औरंगाबाद) मास्टर ऑफ बिझनेस (एमबीए) प्रथम वर्षाचा पेपर फुटल्याबाबत**

**(१७) १०८५८७ (०५-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात सन २०१७ या तीन वर्षात पेपरफुटीचे अधिकाधिक प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी सकाळी १० वाजात एमबीए चा अकाऊंटिंग फॉर मॅनेजर्स या विषयाचा पहिल्या वर्षाचा पेपर हा अवघ्या १० मिनिटांच्या आत सिडको (जि.औरंगाबाद) चौकाजवळील वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रात क्रमांक असलेला विद्यार्थी शेख अमजद यांच्याकडून व्हॉट्सअॅपवरून बाहेर गेला हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पेपरमधील प्रश्नाची उत्तरे लिहिलेल्या कागदाची व्हॉट्सअॅप प्रत विद्यार्थ्यांना मिळाली असल्याची माहिती मिळाल्यानंतर अकाऊंटिंग फॉर मॅनेजर्स ही परीक्षा रद्द करण्यात येत असल्याचे डॉ.नेटके यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना जाहीर केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पेपर फुटीमुळे अभ्यास करून पेपर देणा-ऱ्या मुलांना याचा मनस्ताप होत असून पुन्हा नव्याने उक्त परिक्षा दयावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५)असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय. असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषीवर कोणती कारवाई केली वा असे पेपर भविष्यात फुटू नये याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. एम.बी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्र परीक्षेचा अकाऊंटिंग फॉर मॅनेजर्स हा पेपर, विद्यार्थी शेख अजमद कलीम, बैठक क्रमांक CMBA-१०१८५७ याने परीक्षा दालनातून बाहेर व्हॉटस्अॅपच्या माध्यमातून पाठविला असल्याचे उघड झाले आहे.
(३) सर्व विद्यार्थ्यांची मागणी व भावना लक्षात घेऊन अकाऊंटिंग फॉर मॅनेजर्स या विषयाचा पेपर पुन्हा घेण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने निर्णय घेतला, हे खरे आहे.
(४) बहुतांश विद्यार्थ्यांची मागणी विचारात घेवून या विषयाची फेरपरिक्षा घेण्याचा हा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.
(५) असा प्रकार पुन्हा घडू नये यासाठी विद्यापीठ प्रशासनामार्फत यापूर्वी सूचना/आदेश दिलेले आहेत. तथापि, आणखी कडक उपाययोजना करण्यात येऊन अशा गैरप्रकारावर संपूर्णपणे आळा घालण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.

---

## महाराष्ट्रात कायद्याचे शिक्षण देण्यासाठी मुंबईतील गोराई येथे राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(१८) १०८८५७ (१५-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती**

**दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात कायद्याचे शिक्षण देण्यासाठी मुंबईतील गोराई येथे राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेऊनही सदर विद्यापीठाकरिता आवश्यक जमिन उपलब्ध करुन देण्यात आलेली नसल्याने सदरचे विद्यापीठ प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कायद्याचे शिक्षण देणारे राष्ट्रीय विद्यापीठाची लवकरात लवकर सुरु करण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई साठी कायमस्वरुपी कॅम्पसकरिता महसूल व वन विभागाच्या दि.१०.६.२०१६ च्या ज्ञापनान्वये मंजूर करण्यात आलेली गोराई येथील जागा CRZ-II व CRZ-III बाधित असल्याने तिचे वर्गीकरण करुन बांधकामासाठी योग्य व Open Space संदर्भातील सर्वेक्षण करुन मोजणीचे काम जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेमार्फत करण्यात येत आहे.

तथापि, राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठाचे अध्यापनाचे काम तात्पुरत्या स्वरुपात एमटीएनएल, पवई, मुंबई येथे भाडेतत्वावर घेतलेल्या २ऱ्या व ६वा माळयावर सुरु करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील ३२ विद्यार्थ्यांच्या अपघात विम्याचे बील थकीत असल्याबाबत**

**(१९) १०८९३४ (०६-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने शालेय विद्यार्थ्यांना सुरक्षा कवच म्हणून सुरु करण्यात आलेल्या राजीव गांधी अपघात विमा योजनेतील क्लिष्ट नियमांमुळे या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतील कोल्हापूर जिल्हयातील ३२ विद्यार्थ्यांच्या अपघात विम्याचे देयक थकीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे या विद्यार्थ्यांच्या पालकांना आर्थिक भूर्दंड बसत आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त विद्यार्थ्यांच्या अपघात विमा योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्वाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०६-२०१८) :** (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) या योजनेतंर्गत मार्च, २०१८ अखेर २६ विद्यार्थ्यांचे अपघात विमा सानुग्रह रक्कम रु.१८,७५,०००/- विद्यार्थ्यांचे पालकांच्या खातेवर वर्ग करण्यात आली आहे. व उर्वरीत दाव्यांची पूर्तता करण्यासाठी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दि.१७/०५/२०१८ अन्वये रु.७,६९,६५,०००/- इतके अनुदान वितरित करण्यासाठी शिक्षण संचालक प्राथमिक यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे.

---

**विदेशातील सुपारी जन्य फळांवर रासायनिक प्रक्रीयामुळे नागरिकांचे आरोग्यावर होत असलेला परिणाम**

**(२०) १०९२१५ (१४-०४-२०१८). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलेशिया येथून चोरटया आयातीने आणलेल्या सुपारी सारख्या दिसणाऱ्या सुपारीजन्य फळांवर रासायनीक प्रक्रिया करून राज्यामध्ये विशेषत; विदर्भात अवैध रित्या विक्री होत असल्याबाबत माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सुपारी जन्य फळांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून कॅन्सर ग्रस्त रूग्णांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या फळाच्या मोठया प्रमाणात होत असलेल्या आयातीवर बंदी घालण्यास काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईत इंडियन ऑइल, भारत पेट्रोलिअम, हिंदुस्तान पेट्रोलिअम या कंपन्यांचे पेट्रोल पंप चालविणा-या चालकांकडून ग्राहकांना सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याबाबत**

**(२१) १०९६२७ (१८-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत इंडियन ऑइल, भारत पेट्रोलिअम, हिंदुस्तान पेट्रोलिअम या कंपन्यांचे पेट्रोल पंप चालविणा-या चालकांकडून चाकात हवा भरण्यासाठी, पिण्याचे शुध्द पाणी, प्रसाधन गृह, अस्वच्छ शौचालये आणि इंधन शुध्दता तपासणी करणे आदी हक्काच्या सुविधा ग्राहकांना उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केलेल्या प्रत्यक्ष पाहणीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात एकूण किती पेट्रोल पंपावर ग्राहकांना सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याचे आढळून आले आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार करारातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी सदरहू पेट्रोल पंप चालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच पेट्रोल पंप चालकांनी ग्राहकांना हक्काच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मुंबईत इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम या तिन्ही कंपन्यांचे एकूण २२१ पेट्रोल पंप कार्यरत असून त्यापैकी सर्वच पेट्रोल पंपांवर पिण्याचे शुध्द पाणी, इंधन शुध्दता तपासणी करणे या सुविधा पुरविण्यात येतात. तर २११ पेट्रोल पंपांवर प्रसाधन गृहाची सुविधा पुरविण्यात येत असून जागेच्या अभावामुळे १० पेट्रोलपंपांवर सदर सुविधा उपलब्ध नाही. तसेच २२० पेट्रोलपंपांवर वाहनातील हवा तपासण्याची सुविधा पुरविण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या, ऐतिहासिक 'राजाबाई टॉवर' इमारतीमधील ग्रंथालयाची दुरावस्था झाल्याबाबत**

**(२२) १०९६३० (०५-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या ऐतिहासिक 'राजाबाई टॉवर' इमारतीमधील ग्रंथालयात जुन्या लाकडी टेबल-खुर्च्या, कडया नसलेल्या खिडक्या, मोकळया जागेत दुर्मिळ फाटलेली काही पुस्तके रद्दीत टाकलेली असणे, अनमोल अशी असंख्य पुस्तके आणि ग्रंथ उघडयावर असणे, त्यावर धुळीचा थर जमा होणे तसेच ग्रंथपाल नसणे आदी महत्वाच्या बाबींकडे विद्यापीठ व्यवस्थापनाच्या अनावस्थेमुळे सदरहू वाचनालयाचा लाभ घेणाऱ्या राज्यातील तसेच विदेशातील विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय होत असल्याचे दिनांक १६ जानेवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे अनेकदा तक्रार करुनही त्याची विद्यापीठ व्यवस्थापनाने कोणतीच कार्यवाही न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर ऐतिहासिक वाचनालयाचे नुतनीकरण करणे व अनुभवी ग्रंथपाल, कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) मुंबई विद्यापीठाच्या ऐतिहासिक राजाबाई टॉवरचे नुतनीकरण होत असताना ग्रंथालयातील सर्व ग्रंथांचे वेगवेगळ्या विभागात स्थलांतर करण्यात आले.
(३) मुंबई विद्यापीठाच्या ऐतिहासिक राजाबाई टॉवरची पुनर्रचना करण्याचे काम सुरु असून ते लवकरच पूर्ण होईल असे मुंबई विद्यापीठाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोप्रोली (ता.उरण,जि.रायगड) गावात तसेच कोप्रोली आदिवासी वाडीवर कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(२३) १०९८५० (१९-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)कोप्रोली (ता.उरण,जि.रायगड) गावामध्ये तसेच कोप्रोली आदिवासी वाडीवर कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची पाणी टंचाई होण्याची कारणे काय आहेत,
(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त पाणी टंचाई दूर करण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) चिरनेर ते कोप्रोली ही गावे राज्य महामार्गाचे रुंदीकरणामुळे ४ ते ५ मी. भरावामुळे मुख्य जलवाहिनीचा बहुतांश भाग बाधीत झाला आहे. तसेच हेटवणे धरणाकडून नवी मुंबईकडे जाणाऱ्या सिडको विभागाच्या मुख्य जलवाहिनीचा बराचसा भाग खारेपाट विभागात येत असून पाईप लाईनला काही ठिकाणी गंज पकडल्याने आदिवासी वाडीकडे जाणाऱ्या जलवाहिनीमधून काही वेळा कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. त्यामुळे कधी-कधी कृत्रिम पाणी टंचाई निर्माण होते.
(३) कोप्रोली व कोप्रोली आदिवासीवाडी येथे पाणी पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत कोप्रोली नळपाणी पुरवठा योजनेची मुख्य जलवाहिनी टाकण्याचे काम मंजूर करण्यात आले असून सदर कामाची किंमत रु.१,२३,७७,३२७/- इतकी आहे. या योजनेत कोप्रोली, कोप्रोली आदिवासीवाडी व पाणदिवेवाडी या गावे/वाड्यांचा समावेश आहे. सदर

योजनेच्या कामाकरीता कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली असून नोव्हेंबर, २०१७ मध्ये योजनेचे कार्यादेश देण्यात आले आहेत. उप अभियंता, उप विभाग, पनवेल यांच्यामार्फत कामाचे ले आऊट देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागझरी (तांबडी पाडा) (जि.पालघर) येथील आदिवासी उपयोजनेतून सुरु केलेली पाणीपुरवठा बंद असल्याबाबत**

**(२४) १०९९७२ (१४-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागझरी (तांबडी पाडा) (जि.पालघर) येथील आदिवासी उपयोजनेतून सुरू करण्यात आलेली पाणी पुरवठ्याची विद्युत मोटार जळाल्याने तेथील ग्रामस्थांचा पाणी पुरवठा बंद झाल्याने तेथील शेकडो कुटुंबांनी नागझरी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन ग्रामसेविकांकडे बंद झालेला पाणी पुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पाणी पुरवठा सुरू करण्यासाठी श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पालघर पंचायत समितीच्या प्रवेशद्वारासमोर दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रशासनाच्या विरोधात आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंद झालेला पाणी पुरवठा सुरू होण्यासाठी जळालेली पाणी पुरवठ्याची मोटाराची दुरूस्ती व बदली करून कार्यवाही हेण्यासाठी समर्थन संस्थेने दिनांक ०६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यादरम्यान मा.ऊर्जा मंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री व मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) या विषयाबाबत गटविकास अधिकारी यांच्या दालनात आयोजित केलेल्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कनिष्ठ अभियंता व विस्तार अधिकारी यांनी दिनांक ०४.०१.२०१८ रोजी ग्रामपंचायतीला भेट दिली असता तेथील योजनेची पाण्याची मोटार जळालेली असल्यामुळे पाण्याचा पुरवठा करता येत नव्हता असे दिसून आले. सदर मोटार तात्काळ दुरुस्त करण्याबाबत ग्रामपंचायतीस निर्देश देण्यात आले. त्यानुसार ग्रामपंचायतीमार्फत मोटार दुरुस्त करुन पाणी पुरवठा सुरळीतपणे सुरू करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मराठवाडयासह इतर जिल्हयांमध्ये मुख्यमंत्री पेयजल योजनांचीच प्रक्रिया सुरू करण्याबाबत**

**(२५) ११०२३३ (१९-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुख्यमंत्री पेयजल योजनेत २५१ गावे व ४६४.८० कोटीचा आराखडा सन २०१७-२०१८ साठी घोषित करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे एकूण १७२ योजनांचे प्रस्ताव शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात आले होते त्यापैकी १७ प्रस्ताव विविध त्रुटी आढळल्याने परत पाठविण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेत ८७ योजनांनाच प्रशासकीय मान्यता मिळालेली असून यापैकी जालना जिल्हयातील १० व परभणी जिल्हयातील ३ अशा रूपये २४२ कोटींच्या फक्त १३ योजना कार्यारंभ आदेश देवून सुरू झाल्या असून जालना जिल्हयातच मंजूर २४२ पैकी २४१ कोटीची कामे होत असल्याचे तसेच जालना व बीड जिल्हयांना याबाबत प्राधान्य दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मराठवाडयात मुख्यमंत्री पेयजल योजनेच्या आराखडयातील २५१ पाणीपुरवठा योजनांपैकी १७२ योजनांवरच प्रक्रिया सुरू असल्याने उर्वरित १४० योजना अद्यापही सुरु झाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त योजनांना निधी उपलब्ध करून देताना सर्व जिल्ह्यांमध्ये निधीचे उचीत वर्गीकरण होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०७-२०१८) :** (१) विभागाच्या दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत औरंगाबाद विभागात रु.४६४.८० कोटीच्या २५१ नळ पाणीपुरवठा योजना नव्याने राबविण्याचे प्रस्तावित आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

औरंगाबाद विभागातील २५१ योजनांपैकी ३६ योजना अव्यवहार्य असल्याने वगळण्यात आल्या आहेत. उर्वरित २१५ व्यवहार्य योजनांपैकी रु.३८१.७० कोटीच्या १७१ पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी रु.३०२.४९ कोटी इतक्या किंमतीच्या ८० योजनांच्या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित योजनांच्या निविदा प्रसिध्दीची व मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

**औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील अर्ध घाऊक रॉकेल विक्रेत्याचा परवाना रद्द केल्याबाबत**

**(२६) ११०६३२ (१८-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील अर्ध घाऊक रॉकेल विक्रेते संजयकुमार शर्मा यांनी शहरातील किरकोळ रॉकेल विक्रेत्यांना मागील काही महिन्यांत रॉकेल दिले नसल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याचे आदेश हिंगोली तहसिल कार्यालयास देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदेशानुसार तहसिल कार्यालयाने दुकानाला भेट देवून तपासणी केली होती शिवाय किरकोळ रॉकेल विक्रेत्यांचे जबाब नोंदवून त्यांचा सविस्तर अहवाल तयार केला असून त्यामध्ये संबंधित विक्रेत्यांकडे सुमारे १४ हजार लीटर रॉकेल शिल्लक असणे आवश्यक असताना केवळ ३ हजार लीटर रॉकेलच शिल्लक असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले आहे. यामुळे तहसिल कार्यालयाने दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडे तसा अहवाल सादर केल्यानंतर जिल्हा पुरवठा विभागाने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास औंढा नागनाथ येथील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते संजयकुमार शर्मा यांचा विक्रेत्यांचा परवाना रद्द केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अर्धघाऊक विक्रेत्यांचा परवाना रद्द झाला असतानाही सदर रॉकेल दुकानात रॉकेल उपलब्ध असल्याचे जिल्हा पुरवठा विभागाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) श्री.संजयकुमार बन्सीलाल शर्मा, अर्धघाऊक केरोसिन परवानाधारक, औंढा नागनाथ यांच्याविरूद्ध माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सदर परवानाधारकाची दि.१५ नोव्हेंबर,२०१७ रोजी तपासणी करण्यात आली. सदर तपासणीत परवाना धारकाकडे अभिलेखापेक्षा ११०१० लिटर केरोसिन साठा कमी असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर परवानाधारकाकडून खुलासा घेऊन जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांनी दि.२८ नोव्हेंबर, २०१७ रोजी सदर अर्धघाऊक केरोसिन परवाना रद्द केलेला आहे. तसेच सदर परवानाधारकाकडे असलेला ३००० लिटर केरोसिन कोटा तालुक्यातील इतर अर्धघाऊक केरोसिन परवानाधारकाकडे वर्ग करण्याबाबत दि.३० नोव्हेंबर,२०१७ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांनी आदेश दिले. तथापि, सदर अर्धघाऊक केरोसिन परवानाधारकाने जिल्हा पुरवठा अधिकारी हिंगोली यांच्या दि.२८ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या आदेशाविरूद्ध उप आयुक्त (पुरवठा), औरंगाबाद यांच्याकडे अपील केले. उप आयुक्त (पुरवठा), औरंगाबाद यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्या दि.२८ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या आदेशास स्थगिती दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यांमध्ये शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत हागणदारी मुक्त झाल्याबाबत**

**(२७) १११०८३ (१४-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत हागणदारी मुक्त झाल्याचे कागदोपत्री शासनाच्या निदर्शनास आणून दिल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेमध्ये बेसलाईन यादीतील काही कुटूंब शौचालयापासून वंचित असतांनाही व याची संपूर्ण जबाबदारी ग्रामसेवक यांचेवर असल्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता दाखवून १०० टक्के शौचालयमुक्त झाल्याची चुकीची माहिती पंचायत समिती प्रशासनाला चुकीची माहिती कळविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेमध्ये चुकीच्या पध्दतीने कुटूंबाचे संरक्षण केल्यामुळे यात दोषी असणाऱ्या ग्रामसेवक व संबंधित प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार समाविष्ट असलेल्या कुटुंबानी शौचालय बांधकामे पूर्ण केली आहेत. यासंदर्भातील छायाचित्रे केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड केली आहेत. सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार पात्र असणा-या १०० टक्के लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या एम.कॉम.च्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना जुन्या प्रॅटर्नची प्रश्नपत्रीका देण्यात आल्याबाबत**

**(२८) ११२११३ (०५-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाची एम.कॉमच्या पहिल्या वर्षाची परिक्षा दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास सुरू झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षी एम.कॉमच्या प्रश्नपत्रिकेचा पॅटर्न बदलला असून १५ गुणांच्या ऑबजेक्टीव प्रश्नांचा समावेश सदर परिक्षेत करण्यात आला असून विद्यापीठाने काही ठिकाणी पाठविलेल्या प्रश्नपत्रिकेमध्ये ६० गुणांचे सबजेक्टीव्ह प्रश्न होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परीक्षेमध्ये विद्यापीठाने गत दोन वर्षापूर्वीच्या जुन्या पॅटर्नची प्रश्नपत्रिका पाठविली असल्याने विद्यार्थ्यांनी संतप्त होऊन सदर प्रश्नपत्रिका बदलून देण्याची मागणी केली असून तसेच प्रश्नपत्रिका संचाच्या या प्रकाराबाबत विद्यापीठाने तपशीलवार खुलासा करावा अशी मागणी स्टुडण्ट लॉ कौन्सिलने केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या जुन्या पॅटर्नच्या प्रश्नपत्रिकांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) चुकीची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना वितरित केल्याची बाब Strategic Management या विषयाच्या प्राश्निक, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन यांच्यापुढे सादर करण्यात आली. त्यांनी संबंधित प्रकरणी संयुक्त बैठक घेवून विद्यार्थ्यांना २० गुण वाढवून देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे जुन्या पॅटर्नच्या प्रश्नपत्रिकामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले हे खरे नाही.
(५) संयुक्त बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मुंबई विद्यापीठाने परिपत्रकाव्दारे संबंधितांना सुचित केले. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता विद्यापीठातर्फे घेण्यात आलेली आहे. त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील राजर्षी शाहू महाराज शुल्क व पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाह भत्ता शिष्यवृत्ती योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळाला नसल्याबाबत

**(२९) ११२२११ (१७-०४-२०१८). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजर्षी शाहू महाराज शुल्क योजना व पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाह भत्ता योजनांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शासनाकडून शिष्यवृत्ती देण्यात येते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या योजनांचा पुर्णपणे लाभ मिळाला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने विद्यार्थ्यांचे खाते आधारशी लिंक करून त्यांचे खात्यावर शिष्यवृत्ती देण्याची योजना आखून सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी पोर्टल सुरु केले होते मात्र ही योजना पहिल्याच वर्षी असफल ठरल्याने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळू शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील किती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिष्यवृत्ती देण्यात आली आहे तसेच किती महाविद्यालयांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यात आली मात्र महाविद्यालयाने ती रक्कम विद्यार्थ्यांचे खात्यावर जमा केलेली नाही,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०६-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर काही विद्यार्थ्यांना अर्जाची नोंद करण्यास अडचणी येत होत्या. तसेच महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांचे परिपूर्ण अर्ज शासकीय कार्यालयांकडे पाठविण्यास अडचणी येत होत्या. तसेच सन २०१७-१८ च्या पहिल्या सत्रासाठी सदर पोर्टलचे पूर्णत: कार्यान्वयन होणे बाकी होते. त्यामुळे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१४.२.२०१८ अन्वये दोन्ही योजना महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीने परंतु संबंधित योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यास शासनाची मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या ४७ संस्थांमधील ४६०९ विद्यार्थ्यांचे आधार संलग्नित बँक खात्यामध्ये एकूण रुपये १४,२२,२३,५२५/- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती वितरीत केली आहे. सदर शिष्यवृत्तीची रक्कम कोणत्याही महाविद्यालयाच्या खात्यावर जमा करण्यात आलेली नाही.

(५) दिनांक १४.२.२०१८ च्या शासन निर्णयानंतर तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे संकेतस्थळावर सर्व पात्र विद्यार्थ्यांना दिनांक १७.२.२०१८ ते १५.३.२०१८ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली होती व विभागीय कार्यालयांनी संस्थांकडून ऑनलाईन प्राप्त अर्जावर कार्यवाही करुन दिनांक २३.३.२०१८ पर्यंत संचालक, तंत्र शिक्षण यांना पाठविलेले

आहेत. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील ४७ संस्थांमधील एकूण ८६८३ मंजूर विद्यार्थ्यांपैकी ४६०९ विद्यार्थ्यांना देय असलेली एकूण शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती रक्कम रुपये १४,२२,२३,५२५/- त्यांचे बँक खात्यामध्ये वर्ग केलेली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित मंजूर विद्यार्थ्यांसाठी कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण यांचे स्तरावर सुरु आहे. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा सन २०१७-१८ साठी रुपये २३.४२ कोटी एवढा मंजूर निधी विद्यार्थ्यांना वाटप करण्याची प्रक्रिया सद्य:स्थितीत सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुका व बेरीस्ते ग्रामपंचायतीमधील**
**नळपाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत**

**(३०) ११२४३४ (२०-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील तसेच बेरीस्ते ग्रामपंचायतीमधील सहा पाड्यांमध्ये सीएसआर फंडातून नळपाणीपूरवठा मंजूर योजनेच्या कामाची मुदत संपली असून ठेकेदार व पाणी पुरवठा अधिकारी यांच्या दिरंगाईमुळे उक्त योजना अपूर्ण असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त तालुका कायमचा पाणी टंचाईग्रस्त असून टँकरद्वारे पाणी पुरवठ्यावर कोट्यवधींचा रुपयांचा होणारा खर्च कमी होण्यासाठी टँकरला पर्याय म्हणून ज्या ठिकाणी पाण्याचे उद्भव आहेत त्या ठिकाणांहुन पाणी मोटर किंवा अन्य यंत्रणेद्वारे गावाजवळील विहीरीमध्ये सोडण्यात येणार आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु योजनेची रुपरेषा काय आहे तसेच उक्त योजना राज्यातील अन्य टंचाईग्रस्त भागातही प्रायोगिक स्वरुपात सुरू करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार उक्त पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच दिरंगाई करणाऱ्या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर नळ पाणी पुरवठा योजनेची सर्व उपांगे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली असून पाच पैकी तीन पाड्यांना दिनांक २८.०२.२०१८ पासून व एका पाड्यास दिनांक ०७.०५.२०१८ पासून पाणी पुरवठा सुरु असून उर्वरीत एका पाड्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम दिनांक ३०.०६.२०१८ पुर्वी पूर्ण करण्याचे नियोजन असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर नळ पाणी पुरवठा योजनेचे काम दिनांक २१.०५.२०१७ रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु या कालावधीत ते पूर्ण न झाल्याने, सदर काम करणाऱ्या कंत्राटदारास दिनांक १६.०५.२०१७ रोजी नुकसान भरपाईची नोटीस देण्यात आली आहे. कंत्राटदाराने केलेल्या दिरंगाईबाबत प्रतिदिन रु.५,०००/- प्रमाणे नुकसान भरपाई आकारण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कारवाडी, गंगानगर व रामाकृष्णा (ता.जि.हिंगोली) नगरमध्ये विहीरीला जागा मिळत नसल्याने मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत ही योजना बोगस असल्याबाबत**

**(३१) ११२५७४ (१४-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली तालुक्यातील कारवाडी, गंगानगर व रामाकृष्णा नगरामध्ये विहीरीला जागा मिळत नसल्याने ही योजना मुख्यमंत्री पेयजल योजनेअंतर्गत बोगस असल्याचे माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरात तीव्र पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असून तात्पुरत्या स्वरुपात टँकरने पाणी पुरवठा केला जात असून याठिकाणी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे. मौ.कारवाडी, ता.हिंगोली येथे टंचाई अंतर्गत सद्यस्थितीत टँकरने पाणी पुरवठा केला जात नसून खाजगी विंधन विहिर अधिग्रहित करुन पाणी पुरवठा केला जात आहे.
(३) व (४) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी दिनांक ५.१२.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत कारवाडी गावाला हिंगोली नगर परिषदेकडून पाणी पुरवठा करणे शक्य आहे काय? याची तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुषंगाने नगर परिषद, हिंगोली व मा.आमदार यांच्या समवेत बैठक आयोजीत करण्यात आली. सदर बैठकीत नगर परिषद, हिंगोली यांनी त्यांच्या स्त्रोतामधून कारवाडी गावांला पाणी देण्यास नकार दिलेला आहे. वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, हिंगोली यांनी भूगर्भीय स्त्रोत मिळणे शक्य नसून भूपृष्ठीय स्त्रोत घेण्याबाबत अवगत केले आहे. त्यानुषंगाने भूपृष्ठीय स्त्रोत घेऊन सविस्तर अहवाल बनविण्याची कार्यवाही चालु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग येथील उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(३२) ११२७१३ (२४-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील पाणी आणि स्वच्छता मिशन कक्षाचा अतिरिक्त कारभार सांभाळणारे जिल्हा परिषद सिंधुदुर्ग उप मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.सुनिल रेडकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांची परवानगी न घेताच शासकीय कामासाठी भाडयाने घेतेलेल्या ४ गाडयांचा दुरुपयोग जिल्हा व राज्याबाहेर त्यांचा वाटप केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१२ ते माहे सप्टेंबर, २०१५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या निर्मल भारत स्वच्छ भारत अभियान योजनेमध्ये त्यां गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-०७-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार श्री.सुनिल रेडकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रामुख्याने शासन निर्देशांचे अनुपालन योग्य रीतीने केल्याचे दिसून येत नाही. परंतु वाहनांचा वापर शासकीय कामकाजासाठीच करण्यात आला असल्याने आर्थिक नुकसान झाल्याचे आढळून येत नाही. सदर चौकशी अहलानुसार वाहनांचा जिल्ह्याबाहेर वापर करताना सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेणे आवश्यक होते.सदर प्रकरणी जि. प. सिंधुदुर्ग यांच्या कार्यालयीन आदेश क्र. जा. क्र./सिंजिप/जिपास्वमि/आस्था/१३२५/२०१८ दि. ०५ मे २०१८ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दुकानांवर चिप्स, बिस्कीट, चॉकलेट इ. विकण्यास बंदीच्या परिपत्रकाबाबत**

**(३३) ११२७७६ (१७-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुकानांवर वा टपरीवर चिप्स, बिस्कीट, चॉकलेट इ. वस्तुंची विक्री करण्यास बंदी आणल्याचे परिपत्रक शासनाने काढलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिपत्रकामुळे राज्यातील खेड्यापाड्यातील छोटे दुकानदार वा टपरीधारकांच्या विक्रीवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त परिपत्रकामुळे होणाऱ्या परिणामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अल्पसंख्याक पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण योजना अंतर्गत युवक-युवतीना निवासी प्रशिक्षण देण्याबाबत**

**(३४) ११२९७५ (०५-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्याक पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण योजना अंतर्गत युवक-युवतींना निवासी प्रशिक्षण देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशिक्षण निवासी करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच या प्रशिक्षणाचा गत ३ वर्षापासून जिल्हानिहाय तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०६-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

(३) राज्यातील अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांचे पोलीस सेवेतील प्रमाणात वाढ व्हावी, यासाठी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण योजना निवासी करण्याची कार्यवाही सुरु आहे. पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण योजनेअंतर्गत राज्यात देण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा गत ३ वर्षाचा (सन २०१४-१५ ते २०१६-१७) जिल्हानिहाय तपशिल सोबत जोडला आहे.

पोलीस शिपाई भरती पूर्व प्रशिक्षण योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा गत ३ वर्षाचा जिल्हानिहाय तपशिल

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | वर्षनिहाय प्रशिक्षण दिलेल्या उमेव्दारांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | सन २०१४-१५ | सन २०१५-१६ | सन २०१६-१७ |
| १ | उस्मानाबाद | ५५ | ३० | -- |
| २ | परभणी | ८५ | १२० | १०० |
| ३ | चंद्रपूर | १२८ | १२७ | -- |
| ४ | लातुर | २५ | ११७ | ६२ |
| ५ | धुळे | १०० | १०० | -- |
| ६ | नांदेड | ७७ | २०९ | ५३ |
| ७ | नागपुर | ७४ | १०४ | १०० |
| ८ | यवतमाळ | ४८ | ८४ | ५९ |
| ९ | नाशिक | ३९ | -- | -- |
| १० | अहमदनगर | ८४ | १३२ | ८८ |
| ११ | औरंगाबाद | १०० | ७८९ | १०० |
| १२ | अकोला | ८४ | ३०२ | ८२ |
| १३ | जालना | ४७ | ८९ | ७४ |
| १४ | जळगाव | १०३ | ३२२ | १०० |
| १५ | वाशिम | १०० | १०० | १०० |
| १६ | बुलढाणा | ३९ | १२९ | ४६ |
| १७ | सांगली | ३ | २५ | -- |
| १८ | हिंगोली | ९२ | १०० | १०० |
| १९ | कोल्हापूर | ९० | ३९ | -- |
| २० | गडचिरोली | ४७ | ३२ | ४५ |
| २१ | बीड | ८६ | १३६ | -- |
| २२ | सातारा | ४५ | ५७ | ५५ |
| २३ | वर्धा | १४ | ५६ | -- |
| २४ | गोंदिया | १०० | -- | -- |
| २५ | सोलापूर | -- | -- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | ठाणे | -- | -- | -- |
| २७ | नंदूरबार | -- | ६६ | ८१ |
| २८ | अमरावती | -- | ८१ | ५३ |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी सुरु केलेल्या योजनांच्या प्रचार व प्रसार करण्याबाबत**

**(३५) ११२९७९ (०५-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी सन २००८ पासून अंदाजे २६ विविध योजना सुरु असून त्याच्या प्रचार व प्रसारासाठी शासनाने गत ३ वर्षापासून कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(२) असल्यास, प्रचार व प्रसारासाठी किती वृत्तपत्रात जाहिराती देण्यात आल्या व त्याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला तसेच पुर्ण निधीचा विनियोग केला नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०६-२०१८) :** (१) राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रसिध्दी व प्रचारासाठी राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत विविध जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. तसेच शासनाच्या संकेतस्थळावर योजनांची माहिती प्रदर्शित करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर वेळोवेळी स्थानिक वर्तमानपत्रामधून अल्पसंख्याक विकास योजना संदर्भात जाहिराती देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर अल्पसंख्याक विकास योजनांची माहिती पुस्तिका प्रकाशित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) राज्यातील नामांकित वर्तमान पत्राद्वारे अल्पसंख्याक विकास योजनांना प्रसिध्दी देण्यात येते. त्याकरीता सन २०१४-१५ मध्ये रु.१.६८ लक्ष, सन २०१५-१६ मध्ये रु.१.९६ लक्ष, सन २०१६-१७ मध्ये रु.१.५२ लक्ष तर सन २०१७-१८ मध्ये रु.६३ लक्ष तरतूद वितरीत करण्यात आली आहे. एकूण २२ वर्तमानपत्रामधून अल्पसंख्याक विकास योजनांची जाहीरात देण्यात आली आहे. संबंधित जाहिरातीच्या देयकानुसार वितरीत निधीचा विनियोग केला जातो.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात आयात करण्यात आलेली सौंदर्यप्रसाधने, चॉकलेट्स, सिगारेट्स आदि अवेष्टित वस्तूंची तपासणी करण्याबाबत**

**(३६) ११३००६ (१७-०४-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आयात करण्यात आलेली सौंदर्यप्रसाधने, चॉकलेट्स, सिगारेट्स इत्यादी अवेष्टित वस्तूंची तपासणी करण्यासाठी राज्यभर वैधमापनशास्त्र विभागातर्फे विशेष मोहिम राबविण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मोहिमेअंतर्गत औरंगाबाद प्रादेशिक विभागात १३० दुकानांची तपासणी करण्यात आली असून त्यानुसार ५५ दुकानदारांनी नियमांचा भंग केला असल्याने त्यांचेविरुध्द तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नियमांचा भंग करणाऱ्या ५५ दुकानदारांविरुध्द वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ व त्या अंतर्गत नियमांतील तरतूदींप्रमाणे खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवापूर (जि.नागपूर) येथील भिवापूर महाविघालयास अनुदान मंजूर करण्याबाबत**

**(३७) ११३४३४ (१७-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवापूर (जि.नागपूर) येथे बॅकवर्ड क्लास युथ रिलीप कमिटी या संस्थेच्यावतीने शासन मान्यतेने सर्वप्रथम सन २०१२-१३ पासून भिवापूर महाविद्यालयात विज्ञानविद्या शाखा चालविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक तालुक्यात किमान एक अनुदानित महाविद्यालय या योजनेअंतर्गत भिवापूर महाविद्यालयाने दिनाक २७ जुलै, २०१६ ला पॉवर प्रेझेटेशन मुंबई विद्यापिठात सादर केल्यानंतर दिनाक १० नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास टाक्स फोर्स समितीने महाविद्यालयाची प्रत्यक्ष पाहणी करून शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भिवापूर महाविद्यालयाने उक्त योजनेमध्ये असलेले सर्व नियम व अटी याची पुर्तता केलेली असतांनाही या महाविद्यालयास अद्यापही अनुदान मंजूर करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार भिवापूर महाविद्यालयास १०० टक्के अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) भिवापूर तालुक्यासाठी विज्ञान विद्या शाखेसाठी एकूण २ प्रस्तावांचे कार्यबल गटाच्या समोर सादरीकरण घेण्यात आले होते. तथापि सद्यस्थितीत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ अस्तित्वात आल्यामुळे व सदर कायद्यातील कलम १०७ नुसार बृहत आराखडयामध्ये महत्त्वपुर्ण बाबींचा उल्लेख केलेला दिसून येतो ही बाब विचारात घेऊन या सर्व महाविद्यालयांचे प्रस्ताव यास्थितीत अनुदानासाठी शिफारशीत करणे संयुक्तिक वाटत नसल्याचे अभिप्राय त्रिसदस्यीय समितीने दिले असल्याने यास्थितीत नवीन कायद्यातील तरतूदीनुसार सदरची प्रक्रिया नव्याने राबविण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे विद्यापीठाच्या पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील विनाअनुदानित महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झाले नसल्याबाबत

**(३८) ११३५६४ (०५-०४-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विद्यापीठाच्या पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यातील तीनशेहून अधिक विनाअनुदानित महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर विनाअनुदानित महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) अधिस्विकृतीसाठी पात्र असलेल्या महाविद्यालयांना राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्विकृतीचे अर्ज सादर करण्याबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कळविलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विनापरवाना बाटलीबंद पिण्याचे पाणी उत्पादन करणारे कारखाने बंद केल्याबाबत**

**(३९) ११३६८१ (०७-०४-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाटलीबंद पाण्याचे उत्पादन करताना योग्य प्रकिया होत नसल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आल्याने विनापरवाना बाटलीबंद पिण्याचे पाणी उत्पादन करणारे कारखाने बंद केल्याची बाब दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे जिल्ह्यात बाटलीबंद मिळणारे पाणी आरोग्यास घातक असुन याकडे संबंधित कंपन्या दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास ब-याचदा या बाटल्या दुय्यम आणि घातक प्लॅस्टिकपासून तयार केल्या जातात त्यामुळे त्यातील पाणी अशुध्द होते व पिण्यासाठी ते अयोग्य होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०६-२०१८) :** (१) पुणे विभागात १ एप्रिल २०१७ पासून विनापरवाना पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटरचे उत्पादन करणाऱ्या ३२ कारखान्यांना व्यवसाय बंद करण्याच्या नोटिसा देवून व्यवसाय बंद केले आहेत.

(२) अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही. तथापि, १ एप्रिल २०१७ पासुन १६ एप्रिल २०१८ या कालावधीत पुणे जिल्ह्यात पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटरचे ७ नमूने विश्लेषणाकरीता घेण्यात आले होते. त्यापैकी केवळ १ नमूना असुरक्षीत दर्जाचा आढळला आहे. उर्वरीत ३ नमूने प्रमाणित दर्जाचे व ३ नमुने लेबल दोषयुक्त आढळून आले.

(३) अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) पुणे विभागात १ एप्रिल, २०१७ पासून विनापरवाना पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटरचे उत्पादन करणाऱ्या ३२ कारखान्यांना व्यवसाय बंद करण्याच्या नोटीसा देवून सदरचे व्यवसाय बंद केलेले आहेत. त्यापैकी १५ कारखाने पुणे जिल्ह्यातील असून सांगली जिल्ह्यातील १, सोलापूर जिल्ह्यातील ६ व कोल्हापूर जिल्ह्यातील १० कारखाने आहेत.

पुणे जिल्ह्यात पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटरचे ७ नमूने विश्लेषणाकरीता घेण्यात आले होते. त्यापैकी केवळ १ नमूना असुरक्षीत दर्जाचा आढळला आहे. उर्वरीत ३ नमूने प्रमाणित दर्जाचे व ३ नमुने लेबल दोषयुक्त आढळून आले.

लेबल दोषाच्या ३ नमुन्या प्रकरणी न्यायनिर्णय अधिकारी यांचेकडे खटला दाखल करण्यात येत आहे. तसेच १ असुरक्षित नमुन्याबाबत प्रशासनाकडून खटला दाखल करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात दुधाऐवजी डालडामिक्स आईसक्रीमचा पुरवठा सुरु असल्याबाबत**

**(४०) ११४२६९ (१४-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात अनेक भागात काही बोगस कंपन्या दुधाऐवजी डालडामिक्स आइसक्रिमचा पुरवठा करीत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील वडाळा येथील मेसर्स न्युवेश वेलनेस व्हेंचर्स प्रा.लि.या कंपनीवर टाकण्यात आलेल्या छाप्याबाबत**

**(४१) ११४५४२ (१४-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा, मुंबई येथील मेसर्स न्युवेश वेलनेस व्हेंचर्स प्रा.लि.या कंपनीवर दिनांक १५ नोव्हेंबर, २०१६ रोजी छापा टाकण्यात आला व त्यानुषंगाने विश्लेषणासाठी घेतलेल्या अन्न पदार्थात कोणत्याही प्रकारचे उत्तेजक द्रव्ये आढळून आले नाही, तथापि, सदर प्रकरणातील अन्न पदार्थ लेबलदोषयुक्त आढळून आले असूनही कंपनीवर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिका-यावर कोणती कारावाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणातील अन्न पदार्थ लेबलदोषयुक्त आढळून आले असून अन्न व औषध प्रशासने संबधित कंपनीवर दि.११/१०/२०१७ रोजी न्यायनिर्णय खटले क्र.१४२/२०१७ व १४३/२०१७ दाखल करण्यात आले आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात १२ लाख बोगस शिधापत्रिका रदद करण्यात आल्याबाबत**

**(४२) ११४७२१ (१५-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १२ लाख बोगस शिधापत्रिका रदद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, बोगस शिधापत्रिका धारकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२८-०६-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

राज्यात राबविण्यात येणाऱ्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण या प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांची माहिती पीडीएस डाटाबेसमध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. सद्यस्थितीत राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत एकूण ७ कोटी १६ हजार पात्र लाभार्थ्यांपैकी ८७ टक्के लाभार्थ्यांचे तसेच १४ दुष्काळग्रस्त जिल्हयातील दारिद्र्य रेषेवरील पात्र शेतकरी लाभार्थ्यांचे ८६ टक्के आधार सिडींग पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर आधार सिडिंग Adhar Act, २०१६ या कायद्यांतर्गत करण्यात येत असून त्याकरिता दि. ३० जून, २०१८ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. डाटा डिजिटायझेशन केल्याने अद्यापपावेतो सुमारे १० लक्ष शिधापत्रिका या दुबार, मयत व प्रत्यक्ष गृहभेटीव्दारे अपात्र ठरल्याने वगळण्यात आलेल्या आहेत. उर्वरित लाभार्थ्यांच्या माहितीचे संगणकीकरण करण्याची व त्यानुषंगाने अपात्र शिधापत्रिका वगळण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) मतदार संघातील कामांना अल्पसंख्यांक योजनेंतर्गत मंजुरी मिळणेबाबत**

**(४३) ११४७३० (०५-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) मतदार संघातील कामांना अल्पसंख्यांक योजनेंतर्गत मंजूरी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त निधी मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०६-२०१८) :** (१) होय.
(२) राज्यातील अल्पसंख्याक नागरी क्षेत्र विकास योजनेंतर्गत दि.३१/३/२०१८ च्या शासन निर्णय अन्वये दौंड नगर परिषदेसाठी रु.१० लक्ष अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील बेकायदेशीर परिनियमाबात**

**(४४) ११४९१५ (०५-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात होणाऱ्या व्यवस्थापन परिषद अधिसभा, विद्या परिषद, परीक्षा मंडळाच्या बैठकांमध्ये होणारे निर्णय ठराव इतिवृत्त आदिबाबतची कागदपत्रे जाहिर करण्यास विद्यापीठ प्रशासनाकडून दिरंगाई केली जात असल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील पुणे विद्यापीठ वगळता सर्व विद्यापीठांकडून माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक पद भरतीच्या जाहिराती संकेतस्थळावर ऑनलाईन जाहिर केल्या जातात मात्र सावित्रीबाई फुले विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांनी वारंवार मागणी करूनही याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्ताबाबत विद्यापीठ परिनियम क्रमांक ११९-A प्रमाणे कार्यवाही केली जाते.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दिव्यांगांचा समावेश अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत स्वस्त धान्य वाटप करण्याबाबत

**(४५) ११५३५७ (२०-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांगांचा समावेश अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकान वाटपामध्ये आरक्षण ठेवण्याबाबत अन्नत्याग आंदोलनादरम्यान लोकप्रतिनिधींना दिलेल्या आश्वासनानुसार मा.मुख्यमंत्री तसेच मा.अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री आणि सचिव यांच्या सोबत झालेल्या दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या बैठकीत उक्त निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवरील कारवाई तसेच अन्य मागण्याबाबत अद्यापि कोणतीही कार्यवाही न झाल्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री महोदय यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दिलेल्या आश्वासन आणि कार्यवाहीबाबत तसेच प्रलंबित प्रश्नांच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०६-२०१८) :** (१) होय, खरे आहे.

(२) दिव्यांग व्यक्तींना राज्यातील नविन रास्तभाव/ शिधावाटप दुकाने व किरकोळ परवाने मंजुर करण्याबाबत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मध्ये तरतुद नाही. दिव्यांग व्यक्तींना रास्तभाव/ शिधावाटप दुकाने व किरकोळ परवाने मंजुर करावयाचे झाल्यास त्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ च्या संबंधित कलमामध्ये त्याबाबतचा समावेश करणे आवश्यक आहे. सदर कलमात सुधारणा करणे ही बाब केंद्र शासनाचे अखत्यारित असल्याने कलमात सुधारणा करण्याबाबत दि. ०६.१०.२०१७ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी एकुण २५,०५,३०० इतका अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थी कुटुबांचा इष्टांक मंजुर केला आहे. सदर लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी केंद्र शासनाने वेळोवेळी राज्य शासनास केलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी संबंधितांना दि. १७ जुलै, २०१३ च्या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयानूसार एकटे राहत असलेले व ज्यांना कुठलाही कौटंबिक वा सामाजिक आधार अथवा कायमस्वरुपी उत्पनाचे साधन उपलब्ध नाही अशा दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय अन्न योजनेकरिता पात्र ठरविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा (जि.जळगांव) अल्पसंख्याक बहुल नागरी भागात मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४६) ११६१७३ (०५-०४-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगांव) नगरपालिका क्षेत्रात अल्पसंख्याक बहुल नागरी भागात मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.अल्पसंख्याक मंत्री यांना दिनांक १६ मार्च २०१७, दिनांक २३ ऑगस्ट, २०१७, दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ दिनांक १४ डिसेंबर, २०१७ व दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०६-२०१८) :** (१) होय.

(२) नागरी क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मुलभूत / पायाभूत विकासकामे मंजूर होण्यासाठी मोठया प्रमाणात प्रस्ताव प्राप्त होतात. सदर प्रस्तावावर उचित कार्यवाही करुन निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान वितरीत करण्यात येते. निधीच्या कमतरतेमुळे पाचोरा नगर पालिकेसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात विकास कामांकरीता अनुदान मंजूर करण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील इंजिनिअर महाविद्यालयांतील जागा रिक्त रहात असल्याबाबत**

**(४७) ११६२६३ (०५-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नेमलेल्या डॉ. यादव समितीच्या अहवालानुसार यावर्षी इंजिनिअर महाविद्यालयांच्या प्रवेशात एकूण सुमारे १ लाख ५५ हजार उपलब्ध जागांपैकी ५२,४०० जागा रिक्त राहिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीच्या अहवालानुसार राज्यातील इंजिनिअर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे रिक्त जागांचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर परिस्थिती बदलण्यासाठी राज्य शासन, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, राज्य तंत्र शिक्षण संचालनालय या सगळ्या घटकांनी एकत्र येवून आजतागायत कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०६-२०१८) :** (१) नाही.

यावर्षी (शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये) १,३८,२२६ मंजूर प्रवेशक्षमतेपैकी ५६,४९० जागा रिक्त आहेत.

(२) नाही.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून पुढील शैक्षणिक वर्षामध्ये रिक्त जागांचे प्रमाण कमी-जास्त होत आहे.

(३) रिक्त जागांचे प्रमाण वाढू नये व त्याचा शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी विविध उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. तंत्र शिक्षण संचालनालयाच्या प्रस्तावानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन पदवी व पदविका अभियांत्रिकी संस्थांना मान्यता देण्यात येऊ नये असे, शासन स्तरावरुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस कळविण्यात आले आहे.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता प्रसारीत केलेल्या Approval Process Hand Book नुसार ज्या संस्थांमध्ये मागील ५ वर्षात रिक्त जागांचे प्रमाण ३० टक्के आहे, अशा अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत ५० टक्के घट करण्याचे तसेच मागील ५ वर्षात ज्या अभ्यासक्रमात प्रवेश झालेले नाहीत, असे अभ्यासक्रम बंद करण्याचे धोरण अवलंबिले असल्याचे जाहिर केले आहे.

३. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेमध्ये वाढ/नवीन अभ्यासक्रम राबविण्यासाठी National Borad of Accreditation (NBA) मानांकन प्राप्त करुन घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

४. शासन निर्णय, क्रमांक टीईएम-२०१५/ प्र.क्र.२१९/तांशि-४, दिनांक ३१/३/२०१६ नुसार खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिक मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेचा अवलंब करण्याकरीता, संबंधीत संस्थेला शिखर संस्थेकडून मूल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

५. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता २६ पदवी व पदव्युत्तर पदवी आणि १५ पदविका संस्थांनी संस्था बंद करण्याकरीता अर्ज सादर केला आहे.

६. विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने संचालनालयाच्या वतीने विभागीय स्तरावरुन उद्योजक व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ यांची एकत्रित परिषद घेण्यात आली व त्यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष Industry मध्ये प्रशिक्षण देण्याबाबत विविध पर्यायाचा अवलंब करण्याबाबत चर्चा होऊन त्यासंबंधी कार्यवाही करण्यांत येत आहे.

७. पदविकाधारक विद्यार्थ्यांना त्यांच्यातील रोजगार क्षमता वाढविणे व कौशल्य विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमामध्ये Internship अनिवार्य करण्यात आलेली आहे व त्याला Credit सुध्दा देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

**स्वायत्तता असलेल्या शिक्षण संस्था/कॉलेजांना फी ठरविण्याचे स्वातंत्र नसल्याबाबत**

**(४८) ११६३५९ (०६-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वायत्तता असलेल्या अनेक खासगी विनाअनुदानित शिक्षण संस्था तसेच कॉलेज असून त्यांना आपली फी ठरविण्याची स्वायत्तता नसून तेही कायद्याच्या कक्षेत येत असून शासनाला त्यांच्याही फीचे नियमन करण्याचा अधिकार असल्याचा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निकालाच्या अनुषंगाने खासगी विनाअनुदानित शिक्षण संस्था तसेच कॉलेज यांच्या फीचे नियमन करण्याबाबत शासनाने निर्णयात्मक अंमलबजावणी करण्याबाबत कोणते धोरण ठरविले आहे,

(३) असल्यास, खासगी विनाअनुदानित शिक्षण संस्था तसेच कॉलेज यांच्या फीचे नियमनाबाबत धोरण ठरविले नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०६-२०१८) :** (१) होय.

(२) राज्यातील खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे शैक्षणिक शुल्क "महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम,२०१५" या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणामार्फत निश्चित केले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे व साक्री (जि.धुळे) तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या मनमानी कारभाराबाबत**

**(४९) ११६४२६ (२०-०४-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापडणे (जि.धुळे) येथील स्वस्त धान्य दुकानदाराकडून एका कार्डधारकाने १० किलो तांदूळ, १५ किलो गहू घेतले असतांना दुकानदाराने १४ किलो तांदूळ व २१ किलो गहू घेतल्याची पावती फाडली आणि रेशन कार्डातही तशी नोंद घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त जिल्हयातील धुळे व साक्री तालुक्यातील पुरवठा खात्यातील पुनिअ/पुरवठा निरक्षक हे स्वस्त धान्य दुकानदारांना निर्धारित किंमतीऐवजी अंदाजीत किंमत लावून धान्य वाटप करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने मनमानी करणाऱ्या दुकानदार व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, खरे नाही.
(३) दैनिक दिव्यमराठी या वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने कापडणे येथील रास्तभाव दुकान क्रमांक १५६ व १६७ ची चौकशी करण्यात आली. तक्रारदार हे प्रधानय कुटुंब योजनेच शिधापत्रिकाधारक असून अन्न सुरक्षा योजना लागू झाली त्यावेळी त्यांच्या शिधापत्रिकेत ५ सदस्य संख्या होती. त्यानुसार सदर कुटुंबास १० किलो तांदूळ व १५ किलो गहू देय असल्याने रास्तभाव दुकानदाराने शिधावस्तुंचे त्यानुसार वाटप केले.

तद्नंतर तक्रादार यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या ७ झाली. त्या सदस्यांची Online Data Entry करण्यात आली. तथापि अन्न सुरक्षा योजनेच्या दिलेलया मूळ इष्टांकात वाढ केली नसल्याने शिधापत्रिकेत नव्याने समाविष्ट झालेलया सदस्यांना अन्नधान्य देता येत नाही. तथापि, ऑनलाईन प्रणालीत तयांची नोंद नसल्याने ई-पॉज मशिनद्वारे एकूण ७ सदस्यांची म्हणजेच २१ किलो गहू व १४ किलो तंदूळ अशी पावती निघते. वस्तुस्थिती समजावून सांगितल्यानंतर संबंधित कार्डधारकाने तक्रार मागे घेतली आहे.

तथापि, रास्तभाव दुकानदाराबाबत तक्रार आल्यास किंवा कार्डधारकांनी मागणी केलयानुसार तसेच अन्नदिन साजरा करताना पुरवठा निरिक्षण अधिकारी/पुरवठा निरीक्षक यांचे समक्ष लाभार्थ्यांना धान्याचे वाटप केले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शाळांकडून आरटीई कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(५०) ११६५२० (२४-०५-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणअधिकार कायद्याअंतर्गत वंचित, दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के जागांवर प्रवेश देण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मध्यवर्ती भाग, येरवडा, हडपसर, आंबेगाव या भागातील १०४ शाळांची माहिती संकेतस्थळावरून घेतल्यानंतर त्यापैकी फक्त ३१ शाळांनी पूर्वप्राथमिक वर्गाचा प्रवेशस्तर स्वीकारला असून शाळा पूर्वप्राथमिक स्तर स्वीकारत नसल्याने आर्थिक दुर्बल घटकातील बालकांचा शिक्षणाचा हक्क हिरावून घेतला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्रवेश स्तर ठरविण्याचा अधिकार देणारा १६ जानेवारी, २०१८ चा शासन निर्णय रद्द करणेबाबत व पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०६-२०१८) :** (१) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठीचे आर.टी.ई. प्रवेशाबाबत शासन निर्णय दि.१६ जानेवारी, २०१८ नुसार कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.